**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad – 431 004, Maharashtra, India**
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

संदर्भ क्र. : शैक्ष/ संलग्न/एसएसके/एआरडब्ल्यु/२०१८-१९/ 11899 - 11900 दि. १८-१२-२०१८.

**प्रति,**
**प्राचार्य / संचालक,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**विषय :- अनाथांसाठी लागु केलेल्या १ % समांतर आरक्षणाची राज्यात काटेकोरपणे अंमबजावणी करणेबाबत**

**संदर्भ :- १) शासन परिपत्रक क्र: संकीर्ण १११८/प्र.क्र.४६२/१६-अ दि. ०४ डिसेंबर २०१८.**
**२) शिक्षण संचालनायल क्र: उशिसं/मवि-१/अनाथांसाठी १ % समांतर आरक्षण/परिपत्रक / २०१८/१९९७४ दि. १४ डिसेंबर २०१८.**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ व २ अन्वये अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता शिक्षण व नोकरी यामध्ये खुल्या प्रवर्गातुन १% समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे सदर आरक्षण हे गट अ ते गट ड च्या पदांसाठी सरळसेवा भरतीसाठी लागू करण्यात आले असून अनाथ मुलांना विहित केलेल्या १ % पदभरती होणे आवश्यक आहे.

राज्य शासकीय सेवेतील पदे भरताना संदर्भांकित शासन निर्णय व पत्रामध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत दक्षता घेण्यात यावी, ही विनंती.

**सोबतः-** सोबत शासन निर्णय व शिक्षण संचालनालय यांचे पत्र.

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

या प्रत्राची प्रतः- आरक्षण कक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
Web : www.dhepune E-Mail : mavi.dhepune@nic.in
फ्रोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३.

क्र.: उशिसं//मवि-१/अनाथांसाठी १% समांतर आरक्षण/परिपत्रक/ २०१८/१९९७५ दिनांक: १२.१२.२०१८

14 DEC 2018

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.

२. कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

**विषय:अनांथांसाठी लागू केलेल्या १% समांतर आरक्षणाची राज्यात काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत..**

संदर्भ:१. शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण १११८/प्र.क्र.४६२/१६-अ दि. ४ डिसेंबर २०१८
२. महिला व बालविकास विभागाचा शासन निर्णय क्र.: अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दि. २ एप्रिल २०१८

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ पत्र क्र. १ ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे, कृपया अवलोकनी घ्यावे.

संदर्भ पत्र क्र. २ अन्वये अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता शिक्षण व नोकरी यामध्ये खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. सदर आरक्षण हे गट अ ते गट ड च्या पदांसाठी सरळसेवा भरतीसाठी लागू करण्यात आले असून अनाथ मुलांना विहीत केलेल्या १% आरक्षणाप्रमाणे पदभरती होणे आवश्यक आहे.

राज्य शासकीय सेवेतील पदे भरताना संदर्भांकित शासन निर्णय तसेच संदर्भ पत्र क्र. १ मध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत दक्षता घेण्यात यावी तसेच याबाबत आपल्या स्तरावरुन, आपल्या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संलग्नित महाविद्यालयांना सूचना देण्यात याव्यात.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.

अनाथांसाठी लागू केलेल्या १ % समांतर आरक्षणाची राज्यात कोटकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत.

२४८८४
मदि १

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण १११८/प्र.क्र. ४६२/१६-अ**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ४ डिसेंबर, २०१८.

**वाचा -**

१) शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्र. अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दि. २ एप्रिल, २०१८

**प्रस्तावना -**

महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय दि. २ एप्रिल, २०१८ अन्वये अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता शिक्षण व नोकरी यामध्ये खुल्या प्रवर्गातून १ % समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. सदर आरक्षण हे गट "अ" ते गट "ड" च्या पदांसाठी सरळसेवा भरतीसाठी लागू करण्यात आले आहे. अनाथ मुलांना विहित केलेल्या १ % आरक्षणाप्रमाणे पदभरती होणे आवश्यक आहे.

**शासन परिपत्रक -**

राज्य शासकीय सेवेतील गट-अ ते गट-ड ची सरळसेवेची पदे भरताना सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी अनाथांसाठी असलेल्या १ % आरक्षणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. विहित केलेल्या आरक्षणाच्या प्रमाणानुसार केवळ खुल्या प्रवर्गातच पदांची गणना करून त्यानुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी पदभरती करावी. सर्व प्रशासकीय विभागांनी आणि त्यांच्या अधिनस्त कार्यालयांनी रिक्त पदे भरताना जाहिरातीमध्ये अनाथांसाठी १ % आरक्षण नमूद करण्याची दक्षता घ्यावी. महिला व बालविकास विभागाच्या दि. २ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तींना अनुसरून अनाथांना आरक्षण देण्यात यावे.

या परिपत्रकातील सूचना शासकीय /निमशासकीय सेवा, शासनाचे उपक्रम, महामंडळे, मंडळे, शासन अनुदानित संस्था व ज्यांना मार्गदर्शक सूचना देण्याचे अधिकार शासनाला आहेत अशा सर्व संस्था व सेवा यामधील नियुक्त्यांसाठी लागू राहतील. सदर सूचना प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुखांच्या निदर्शनास आणाव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८१२०४१४३९३६६५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
Date: 2018.12.04 14:43:54 +05'30'

(टि. वा. करपते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत.